महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९१२३९१४
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

क्रमांक:डीआरए-०५२१/प्र.क्र.१२५/२०२३/जाहिरात दिनांक: २५ सप्टेंबर, २०२३

**शुध्दीपत्रक :-**

**विषय : सहायक प्राध्यापक, शासकीय औषध निर्माण महाविद्यालय, महाराष्ट्र अभियांत्रिकी शिक्षक सेवा, गट-अ**

**संदर्भ : (१) जाहिरात क्रमांक - ०५०/२०२३, दिनांक १ सप्टेंबर, २०२३**

**(२) शासन पत्र, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक संकीर्ण २०२१/प्र.क्र.(११८/२१)भाग-१७/तांशि-१, दिनांक २२ सप्टेंबर, २०२३**

शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागातील तंत्र शिक्षण संचालनालयांतर्गत सहायक प्राध्यापक, शासकीय औषधनिर्माण महाविद्यालय, महाराष्ट्र अभियांत्रिकी शिक्षक सेवा, गट-अ या संवर्गाच्या एकूण ०६ पदांच्या भरतीकरीता महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून दिनांक १ सप्टेंबर, २०२३ रोजी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली आहे. प्रस्तुत जाहिरातीच्या अनुषंगाने, शासनाच्या, उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडून दिनांक २२ सप्टेंबर, २०२३ रोजीच्या पत्रान्वये प्राप्त अभिप्रायानुसार, जाहिरातीमधील पदव्युत्तर पदवी या शैक्षणिक अर्हतेस NIPER या संस्थांमार्फत प्रदान करण्यात आलेल्या M.S. (Pharm) तसेच M.Tech. (Pharm) या अर्हता समतुल्य अर्हता म्हणून ग्राह्य समजण्यात येतील:-

२. उपरोक्त समतुल्य अर्हता ग्राह्य समजण्यात आल्यामुळे, अर्हताप्राप्त उमेदवारांना अर्ज सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात येत असून विषयांकित संवर्गाच्या जाहिरात क्रमांक ०५०/२०२३ या जाहिरतींस अनुसरुन अर्ज सादर करण्याच्या प्रक्रियेस खालीलप्रमाणे मुदतवाढ देण्यात येत आहे:-

| अ.क्र. | तपशील | विहित कालावधी |
|---|---|---|
| १ | अर्ज सादर करावयाचा अंतिम कालावधी | दिनांक ०३ ऑक्टोबर, २०२३ रोजी २३.५९ |
| २ | ऑनलाईन पध्दतीने विहित परीक्षा शुल्क भरण्याकरीता अंतिम दिनांक | दिनांक ०३ ऑक्टोबर, २०२३ रोजी २३.५९ |
| ३ | भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरण्यासाठी चलनाची प्रत घेण्याचा दिनांक | दिनांक ०५ ऑक्टोबर, २०२३ रोजी २३.५९ |
| ४ | चलनाद्वारे परीक्षाशुल्क भरण्याचा अंतिम दिनांक | दिनांक ०६ ऑक्टोबर, २०२३ रोजी बँकेच्या कार्यालयीन वेळेमध्ये |

३. जाहिरातींमधील इतर अटी व तरतुदींमध्ये कोणताही बदल नाही.

४. सदर शुध्दीपत्रक तसेच मूळ जाहिरात क्रमांक ०५०/२०२३ आयोगाच्या https://mpsc.gov.in तसेच https://mpsconline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

उप सचिव, जाहिरात
महाराष्ट्र लोकसेवा आयोग

ठिकाण : नवी मुंबई.

(१) आयोगाच्या कार्यालयात, परीक्षा कक्षात, परीक्षा केंद्राच्या परिसरात, तसेच, शारीरिक चाचणी व मुलाखतीच्या वेळी मोबाईल फोन, अथवा इतर कोणत्याही प्रकारची इलेक्ट्रॉनिक साधने आणण्यास व वापरण्यास सक्त मनाई आहे.
(२) प्रमाणपत्र तपासणीच्या वेळी पात्रतेसंदर्भातील सर्व मूळ प्रमाणपत्रे सादर न केल्यास शिफारस/नियुक्तीसाठी विचार करण्यात येणार नाही.